शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

<u>तक्रार अर्ज क्रं.२०/२०२३</u>

| | |
|---|---|
| श्रीमती शाहिन अब्दुल अजिज पटेल<br>रूद्राक्ष रेसिडेन्सी बिल्डींग नं. आर-११,<br>प्लॅट नं. एफ-०३, तामजाई नगर, सातारा | } तक्रारदार |
| विरूध्द् | |
| १. कोरेगाव एज्युकेशन सोसायटी कोरेगाव,<br>बडी प्लाझा बिल्डींग,मेन रोड कोरेगाव,<br>जि.सातारा.<br><br>२. शंकरराव जगताप आटर्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज वाघोली,<br>ता. कोरेगाव, जि.सातारा. | } वि. प |

कोरेगाव एज्युकेशन सोसायटी कोरेगाव, जि.सातारा यांचे शंकरराव जगताप आटर्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज वाघोली, ता. कोरेगाव, जि.सातारा यांचेकडील शिक्षिका श्रीमती शाहिन अब्दुल अजिज पटेल यांनी दि.०८/०२/२०२३ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी, डॉ. शाहिन अब्दुल अजिज पटेल सहा.प्राध्यापक हिंदी विभाग, शंकरराव जगताप आटर्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज वाघोली, ता. कोरेगाव, जि.सातारा येथे दि.२०/०६/२००८ पासून नियमित सेवेत कार्यरत आहे. मी दिनांक ०९/०४/२०२२ रोजी (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) साठी पात्र झाले. त्यानंतर दिनांक ०६/०९/२०२२ रोजी होणा-या (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) च्या स्थाननिश्चीतीसाठी मी सर्व कागदपत्रासह प्रस्ताव तयार केला. त्या प्रस्तावावर प्राचार्यांनी सही करण्यास विनंती केली, मात्र प्राचार्यांनी माझ्या त्या प्रस्तावावर सही केली नाही. त्यामुळे नाईलाजाने व प्रस्ताव वेळेत सादर करायचा असल्यामुळे प्राचार्यांच्या सही शिवाय प्रस्ताव, त्याचे आवश्यक शुल्क भरून मी शिवाजी विद्यापीठात सादर केला. शिवाजी विद्यापिठाने या प्रस्तावानुसार मुलाखतीचे आयोजन केले व या मुलाखतीला प्राचार्य, संस्था प्रतिनिधी व विभागप्रमुख यांना

उपस्थित राहण्याबाबत कळविले. शिवाजी विद्यापीठामध्ये दिनांक ०६/०५/२०२२ रोजी झालेल्या (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) च्या माझ्या मुलाखतीवेळी मी हजर होते. मात्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संस्था प्रतिनिधी व विभाग प्रमुख यापैकी कोणीही हजर राहीले नाहीत. त्यामुळे या दिवशी माझी मुलाखत मी पात्र असून देखील होवू शकली नाही. परिणामी मी पात्र असून देखील मला (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) चे लाभ मिळाले नाहीत. परंतू माझ्या महाविद्यालयातील श्रीमती डॉ.लता आंदे यांच्या प्रस्तावावर मा.प्राचार्यांनी सह्या केल्या आणि दि.१०/०५/२०२२ रोजी त्यांच्या मुलाखतीसाठी हजरही राहिले. याच दिवशी मला दिनांक १०/०५/२०२२ रोजी शिवाजी विद्यापीठात प्रस्तावावरती सह्या दिल्या. शिवाजी विद्यापीठात हाच कॅम्प १२/०५/२०२२ पर्यंत चालणार होता. विद्यापीठ प्रशासन याच कॅम्प मध्ये माझी मुलाखत घेण्यास तयार होते परंतु प्राचार्यांनी त्यांच्या सूचनेकडे जाणीवपुर्वक कानाडोळा करीत कोणतेही पाऊल उचलले नाही व मला सांगितले की, तुमच्या प्रस्तावावर सह्या पुढच्या कॅम्पसाठी दिल्या आहेत.

दिनांक २५/०८/२०२२ रोजी (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) साठी शिवाजी विद्यापीठात कॅम्पचे आयोजन कले होते. त्याच दिवशी सदर महाविद्यालयातील हिंदी विषयाचे विभागप्रमुख प्रा.डॉ.पी.आर.रगडे यांच्याही (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) च्या मुलाखती होत्या. संस्था प्रतिनिधी व प्राचार्य सदर दिवशी मुलाखतीच्या ठिकाणी हजर होते. डॉ. रगडे यांची मुलाखत झाली त्यावेळी संस्था प्रतिनिधी व प्राचार्य त्यामध्ये सहभागी होते. डॉ. रगडे यांच्या नंतर मुलाखतीसाठी माझ नाव पुकारले. डॉ. रगडे हे देखील हिंदी विषयाचे होते, त्यामुळे आहे त्या कमीटी समोर माझी मुलाखत होणार होती. परंतु मी सादरीकरणाची पीपीटी लावेपर्यंत संस्था प्रतिनिधी, प्राचार्य व विभागप्रमुख मुलाखतीचे ठिकाण सोडून निघून गेले. संस्था प्रतिनिधी, प्राचार्य व विभागप्रमुख नसल्याने माझी मुलाखत होवू शकली नाही.

दिनांक ०९/०१/२०२३ रोजी विद्यापीठाने पुन्हा (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) चा कॅम्प आयोजित केला. त्या कॅम्पसाठी मी पुन्हा तिस-या वेळेस सर्व कागदपत्रानिशी प्रस्ताव तयार केला. मा.प्राचार्यांनी त्यावर सही करण्यास विनंती केली असता त्यांनी सुरूवातीस नकार दिला, टाळाटाळ केली. संस्थेचे खजिनदार श्री. दत्तात्रय कशीनाथ महाजन दिनांक ०२/०१/२०२३ रोजी महाविद्यालयात आले. त्यांनी माझ्याकडे संस्थेस आर्थिक मदत करा, पैसे द्या, तरच तुमचा कॅसचा प्रस्ताव मंजूर होईल, असे सांगितले. मी त्यांच्या आवाहनास स्पष्ट नकार दिला. पैसे देणार नसल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी मला बाहेर जाण्यास सांगितले. दुस-या दिवशी प्राचार्यांनी प्रस्तावावर सही

केली. आवश्यक ते शुल्क मी भरले हाते. मी पुन्हा एकदा माझा प्रस्ताव शिवाजी विद्यापीठात सादर केला. ठरल्या प्रमाणे विद्यापीठाने दिनांक ०९/०१/२०२३ रोजी (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) चा कॅम्प आयोजित केला. योगायोगाने त्याच दिवशी आमच्या महाविद्यालयातील राज्यशास्त्र विषयाच्या प्रा.डॉ.व्ही.एन.पाटील यांचीही मुलाखत होणार होती. सदर दिवशी मुलाखतीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, संस्था प्रतिनिधी श्री. दत्तात्रय काशीनाथ महाजन विद्यापीठात हजर राहीले. डॉ.व्ही.एन.पाटील यांचीही मुलाखत होवून त्यांचा स्थाननिश्चीतचा प्रस्ताव मंजूर झाला. त्यानंतर हिंदी विषयासाठी माझी मुलाखत होणार होती. मी उभयतांना माझ्या मुलाखातीसाठी थांबण्याची विनंती केली. मा.कुलगुरू प्रतिनिधींनी स्वतः संस्था प्रतिनिधी श्री.दत्तात्रय काशीनाथ महाजन यांना माझ्या मुलाखतीसाठी थांबण्यास सांगितले, मात्र संस्था प्रतिनिधी श्री. महाजन याही वेळेस निघून गेले. परिणामी या वेळेस माझी मुलाखत होवू शकली नाही.

मी संस्थेला पैसे दिले नाहीत म्हणून त्यातून चिडून जावून ते माझी मुलाखत होवू देत नाहीत संस्था प्रतिनिधी हा मुलाखत घ्यावयाच्या कमीटीचा प्रमुख/अध्यक्ष असल्याने त्याच्या उपस्थितीशिवाय मुलाखत होवू शकत नाही. मी (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) साठी पूर्णपणे पात्र आहे. मात्र मी संस्थेला पैसे दिले नाही या कारणावरून संस्थाचालक माझी मुलाखत होवू देत नाहीत. (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) कॅसचा लाभ हा मुलाखत होवून निवड झालेल्या दिनांकापासून पूढे लागू होतो परंतू संस्था प्रतिनिधी, प्राचार्य व विभाग प्रमुख माझी मुलाखत होवू नये यासाठी गैरहजर राहतात. परिणामी मला (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) चा लाभ मिळू शकला नाही. त्यामुळे माझे प्रचंड न भरून येणारे नुकसान झाले आहे व होत आहे. वर नमूद तीनही घटनांचा विचार केला तर भविष्यात ही मला (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) चा लाभ मिळणार नाही अशी भिती वाटू लागल्याने मी सदरची तक्रार दाखल करीत आहे.

सदर संस्थाचालक हे मला नेहमीच त्रास देत आले आहेत. यापुर्वीही त्यानी माझी सेवा बेकायदेशीररित्या समाप्त केली होती. त्याविरूध्द् मी मे. विद्यापीठ न्यायाधीकरण पुणे यांचे कोर्टात अपील नं.१२/२०१० दाखल केले होते. सदर अपिल कोर्टाने मंजूर केले व सेवेत पूर्वतत रूजू करण्याबाबत आदेश दिले. त्यानुसार मी सध्या सेवेत आहे. त्याचा ही राग संस्था चालकांच्या मनात आहे. मी एक अल्पसंख्याक महिला आहे. केवळ मला त्रास देण्याच्या हेतूने हा त्रास संस्थाचालक देत आहेत. सबब १) दिनांक ०९/४/२०२२ रोजीपासून (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A)

वरील केंसचे लाभ मला देण्यासंदर्भात विद्यापीठ व संबधित महाविद्यालय व्यवस्थापनास आदेश व्हावेत. २) माझा कोणताही दोष नसताना (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) चे लाभ सदर महाविद्यालय व्यवस्थापन मला मिळू देत नाही. सबब या थकित वेतनावर १६ टक्के दराने व्याज देण्याबाबत देखील महाविद्यालय व्यवस्थापनास आदेश व्हावेत.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

१. विद्यापीठ सुचनेनुसार डॉ.पटेल यांची स्टेज २ ची दुरूस्ती दि. १८/०२/२०२२ रोजीची असलेन त्यापुर्वी स्टेज ४ चा प्रस्ताव सादर केलेला नाही.

२.दि.२५/०८/२०२२ च्या स्टेज ४ च्या शिबीरास संस्थेचे अध्यक्ष श्री.महाजन सर यांची तब्बेत अचानक बिघडल्याने उपस्थित राहता आले नाही. विभागप्रमूख व प्राचार्य उपस्थित होते.

३. दि.०९/१/२०२३ च्या शिबिरावेळी अध्यक्ष श्री.महाजन सर यांचे पत्नीची तब्बेत बिघडली व प्रत्यक्ष शिबिरावेळी श्री.महाजन सर यांची ही तब्बेत बिघडल्याने त्यांना उपस्थित राहता आले नाही. विभाग प्रमुख व प्राचार्य उपस्थित होते.

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तुत प्रकरण आज रोजी समिती समोर सुनावणी करिता आले असता तक्रारदार स्वतः हजर होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वाय.बी.घोटे तसेच संस्थेतर्फे अधिकार पत्राने श्री.सी.के.वीरकर हजर होते. सुनावणी दरम्यान ही बाब प्रकर्षाने निदर्शनास आली की, तक्रार अर्जात जे नमूद केलेले बहुतांश तथ्य हे गैर अर्जदार यांना मान्य आहेत. दि.२५/०८/२०२२ आणि दि.०९/१/२०२३ रोजीच्या कॅस शिबीरास गैर अर्जदार, महाविद्यालयाचे अध्यक्ष, विभागप्रमुख आणि प्राचार्य हजर होते. परंतु नेमके तक्रारदाराच्या मुलाखतीच्या वेळेस संस्था अध्यक्ष हजर राहिले नाहीत. ही बाब देखील संस्थेतर्फे मान्य करण्यात आली आहे. प्राचार्य डॉ.वाय.बी.घोटे यांनी नेमके तक्रारदाराच्या मुलाखती वेळेस अध्यक्षांच्या गैरहजरीचे कारण 'अध्यक्षांच्या स्वतःची व त्यांच्या पत्नीची तब्येत खराब असल्याचे सांगितले' ही बाब समितीपूढे सांगण्याकरिता संस्था अध्यक्ष स्वतः हजर राहिलेले नाहीत. कोणत्या कारणाने संस्था अध्यक्ष किंवा त्यांच्या पत्नीची तब्येत बिघडली ही बाब संस्था अध्यक्षांच्या विशेष माहितीची होती. आणि भारतीय पुरावा कायदा १८७२ कलम १०६ खाली त्यांनी स्वतःहुन या समितीसमोर हजर राहून सांगायला पाहिजे होती. याउलट त्यांनी अधिकारपत्र देवून अशा एका इसमास या समितीपुढे सुनावणीकरिता हजर राहण्यास सांगीतले की, ज्याला त्यांच्या प्रकृतीबाबत कोणतीही वैयक्तीक माहिती असण्याची शक्यता

नाही. त्यामुळे शिबीरास संस्थेचे अध्यक्ष संयुक्तीक कारणाकरिता गैरहजर राहीले असे मानता येत नाही. ज्यावेळेला संस्थचे शिक्षक/कर्मचारी स्वतःच्या प्रगतीकरिता उत्सुक असतात आणि बढतीकरिता पात्र असतात त्यावेळी त्यांच्या प्रगतीकरिता ठोस कारण असले शिवाय, मदत करणे संस्था चालकांकडून अपेक्षित असते. कोणत्याही ठोस कारणाशिवाय शिक्षक/कर्मचाऱ्यांच्या प्रगतिच्या आड येणे हे संस्था चालकांचे गैरवर्तन आहे आणि ते कोणत्याही दृष्टीकोनातून मान्य केले जाऊ शकत नाही. तक्रारदारांनी संस्थे विरूध्द् बरेच गंभीर आरोप केले आहेत. त्या आरोपांच्या शाबितीकरिता त्यांनी काही पुरावे दिलेले नाहीत. या समितीला देखील त्या आरोपांबददल फार काही बोलावेसे वाटत नाही. परंतु ही समिती अशा आरोपांकडे कानाडोळा देखील करू शकत नाही. युक्तीवादा दरम्यान ही बाब समितीच्या दृष्टीक्षेपात आली आहे की, तक्रारदार यांचे सुरूवातीचे स्थाननिश्चीतीचे दोन प्रस्ताव महाविद्यालयाचे प्राचार्य यांची सही न घेता कॅस समितीकडे पाठविले होते. त्यामुळे उभयपक्षी संबधामध्ये तणाव आलेला होता आणि आहे. तथापि पुढचे स्थाननिश्चितीचे दोन प्रस्ताव प्राचार्याच्या सहीने पाठविण्यात आले आहेत ही बाब मान्य आहे. त्यामुळे तक्रारदारांची कृती गैरअर्जदार संस्थेने माफ केली आहे असे दिसून येते. तथापि त्याच कारणावरून कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय कॅस शिबीरामध्ये नेमक्या तक्रारदाराच्या मुलाखती वेळीस कोणतीही संयुक्तीक कारण नसताना संस्था अध्यक्षांनी गैरहजर राहणे हे सर्वस्वी गैर आहे. सदरची बाब तक्रारदारवर अन्यायकारक आहे. तक्रारदाराच्या कथनावरून हे शाबित होते की, त्याच दिवशी इतरही प्राध्यापकांच्या मुलाखतीच्या वेळेस संस्था अध्यक्ष हजर होते आणि त्यांचे स्थाननिश्चितीचा प्रस्ताव मंजुर झालेले आहेत. संस्था प्रतिनिधी हे स्थाननिश्चिती (CAS) समितीचे प्रमुख/अध्यक्ष असलेने त्यांच्या उपस्थिती शिवाय मुलाखत होऊ शकत नाही ही बाब उभयपक्षी मान्य आहे. तक्रारदार (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) करिता पात्र आहेत याबाबतीत कोणाचेही दुमत नाही. त्यामुळे तक्रारदारांनी आपली तक्रार पुर्णतः शाबित केलेली आहे या निर्ष्कशास ही समिती आलेली आहे. तक्रारदार आपल्या तक्रार अर्जामध्ये (अ) (ब) या परिच्छेदामध्ये काही मागण्या केल्या आहेत. दि.०९/०४/२०२२ पासुन (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) लाभ देण्यासंदर्भात विद्यापीठ व संबधीत महाविद्यालय व्यवस्थापणास आदेश व्हावेत आणि त्यांचा कोणताही दोष नसताना (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) लाभ मिळण्याबाबत आदेश व्हावेत परिच्छेद (ब) मधील मागणी ही त्यांना बढती मिळाली असुन त्यांना बढती मिळेल असे गृहीत धरून व त्याबाबत या समितीला आदेश करता येणार नाही. परंतु परिच्छेद (अ) मधील मागणी काही मर्यादीत स्वरूपात तक्रारदाराच्या मान्य करता येतील असे या समितीचे मत आहे. सबब ही समिती खालील आदेश पारित करित आहे.

# आदेश

तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

१. जाबदार महाविद्यालयाचे प्राचार्य यांना तक्रारदार यांचा (स्टेज ४) (AGP-9000) (Academic Level 13-A) स्थाननिश्चिती लाभ मिळण्याबाबत फेरप्रस्ताव पाठविण्याचा आदेश देण्यात येत आहे.

२. संस्था अध्यक्ष व पदाधिकारी यांना पुढील स्थाननिश्चिती शिबीरात कोणतेही कारण न देता तक्रारदाराच्या मुलाखतीवेळेस प्रत्यक्ष हजर राहण्याचा आदेश देण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 19/10/2023

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)